ARTHA (Commercial Weekly)
Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २४ पुणें, बुधवार तारीख १७ डिसेंबर, १९५८ अंक ४६

## विविध माहिती

**समारंभ-प्रसंगीं स्त्रिया नाहींत**—भारताचे अध्यक्ष डॉ. राजेंद्र प्रसाद मलायाच्या दौऱ्यावर असतांना त्यांच्याबरोबर त्यांच्या पत्नी नव्हत्या. त्यामुळें कुआलालंपूर येथील सरकारी समारंभांत स्त्रियांना बोलावणें नव्हतें. राज्य कायदेमंडळाच्या एकमेव स्त्री-सभासदापुरतां मात्र अपवाद करण्यांत आला होता. भारतीय हाय कमिशनरच्या उद्यान-चहापानाला मात्र ८०० स्त्रियांना बोलावण्यांत आलें होतें.

**परदेशी वकिलातींतील हिंदी नोकर**—दिल्ली येथील परदेशीय वकिलातींच्या कचेऱ्यांतून काम करणाऱ्या हिंदी नोकरांची संख्या १८०४ आहे. सर्वांत अधिक नोकर म्हणजे ५९३ नोकर अमेरिकेच्या वकिलातींत आहेत. त्या खालोखाल ब्रिटिश वकिलातींत ३४४ हिंदी लोक आहेत. रशिअन वकिलातींत १७६ आहेत. दिल्लींत एकूण ५२ परदेशी राजनैतिक प्रतिनिधींच्या कचेऱ्या आहेत.

**खंडसारी साखरेचे कारखाने**—श्रीरामपूर तालुक्यांत खंडसारी साखर तयार करण्याचे दोन नवे कारखाने चालू झाले आहेत. प्रत्येक कारखाना दररोज खंडसारी साखरेचीं १०० पोतीं तयार करूं शकेल. खंडसारी साखर मोठ्या कारखान्यांतील साखरेइतकीच पांढरी व वासरहित असते. दर बंगाली मणाला ३६ रुपये भाव येऊं शकतो. श्रीरामपूर तालुक्यांतील गुळाचें उत्पादन आतां घटण्याचा संभव आहे.

**शेतकरी सहकारी कारखाना**—सांगली जवळ तीन मैलांवर शेतकरी सहकारी साखर कारखान्याचें उद्घाटन करण्यांत आलें. कारखाना उभारण्यासाठी १२५ लाख रुपये भांडवल लागलें. आसपासच्या १० मैलांच्या परिसरांतील ७८ खेड्यांतून कारखान्याला उसाचा पुरवठा होणार आहे. रोज १,२०० पोतीं तयार करणारी यंत्रसामुग्री बसविण्यांत आली आहे.

**सिमेंटवरील निर्बंध रद्द**—मध्य प्रदेश सरकारनें सिमेंटच्या विक्रीवरील निर्बंध रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. निर्णयाच्या अंमलबजावणीस ताबडतोब प्रारंभ होईल. सिमेंटच्या विक्रीवरील निर्बंध रद्द करण्यांत आल्यामुळें राज्यांत इमारतींच्या बांधकामांना अधिक प्रमाणांत सुरुवात होईल, अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

**तागाच्या उत्पादनाचा उच्चांक**—भारताची फाळणी झाल्यापासून कधींहि झालें नव्हतें इतकें तागाचें उत्पादन चालू वर्षीं होईल असा अंदाज करण्यांत आला आहे. तागाच्या ५२ लाखांवर गांसड्या निर्माण होतील. गेल्या वर्षींचें उत्पादन ४१ लाख गांसड्या होतें. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या कालांत दरसाल ५५ लाख गासंड्या उत्पादन करण्याचें उद्दिष्ट ठेवण्यांत आलें होतें.

**विमा नौकरांना बोनस**—आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या नौकरांना दोन महिन्यांचा पगार बोनस म्हणून देण्याचें मध्यवर्ती सरकारनें ठरविलें असल्याची वार्ता आहे. सरकारनें आपला निर्णय कॉर्पोरेशनच्या अधिकाऱ्यांना कळविला आहे. दोन महिन्यांचा बोनस मिळण्याबद्दल कॉर्पोरेशनच्या नौकरांनीं चळवळ चालविली होती.

**स्टेट ट्रॅन्सपोर्टसाठी नवी इमारत**—रत्नागिरी येथें स्टेट-ट्रॅन्सपोर्टच्या विभागीय कारभारासाठी नवी इमारत बांधण्यांत आली आहे. इमारतीचें उद्घाटन अध्यक्ष श्री. सरय्या ह्यांनीं केलें. तीसाठी १ लाख रुपये खर्च आला आहे. ह्या प्रसंगीं बोलतांना श्री. सरय्या ह्यांनीं प्रवाशांना अधिक सोयी उपलब्ध करून देण्याचा विचार होत आहे असें सांगितलें.

**५०,००० रुपयांचा दंड वसूल**—भारत सरकारच्या गृहखात्यानें ऑक्टोबर महिन्यांत खास पोलिस खात्यानें चालविलेल्या चौकशींत दोषी ठरलेल्या अधिकाऱ्यांकडून २५,००० रुपये दंड वसूल केला. त्यांच्यावर खात्यातर्फे काम चालविण्यांत आलें होतें. त्याशिवाय कोर्टांत शिक्षा झालेल्या नौकरांकडून आणखी २५,००० रुपये वसूल झाले.

**महारोगावर नवें औषध**—टोकिओ येथें महारोगासंबंधी ७ वी कॉंग्रेस भरविण्यांत आली होती. कॉंग्रेसमध्यें महरोगासंबंधीं एक नवें औषध तयार करण्यांत आल्याची माहिती बाहेर आली. नवें औषध कातडीवर चोळल्यावर त्याचा परिणाम सर्व शरीरावर पसरतो. नायजिरीआंत ते यशस्वी रीत्या वापरण्यांत आलें आहे असें म्हणतात. भारतांत सुमारें २० लाख महारोगी आहेत.

दातांच्या स्वच्छतेसाठी
★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## आयुर्वेदाश्रम फार्मसी लि. चा रौप्यमहोत्सव

### आयुर्वेदाच्या शिक्षणास मदत व आयुर्वेदिक औषधांचें संशोधन

आयुर्वेदाश्रम फार्मसी लिमिटेड किंवा 'आफालि' या कंपनीचा रौप्यमहोत्सव रविवार ता. ७–१२–१९५८ रोजीं मुंबई राज्याचे मुख्य मंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांचे अध्यक्षतेखालीं साजरा झाला.

### कै. शास्त्रीबुवांची कल्पकता

नगर शहरांत कै. वैद्यपंचानन गंगाधरशास्त्री गुणे हे आपला वैद्यकीय व्यवसाय करीत असतांना आयुर्वेदाचें शिक्षण देणारी एक संस्था काढावी असें त्यांच्या मनांत आलें व त्याप्रमाणें त्यांनीं शिक्षण देऊन कांहीं शिष्य तयार केले. या शिष्यांच्या मदतीनें त्यांनीं १९२४ सालीं आयुर्वेदाश्रम औषधी शाळा सुरू केली व त्या ठिकाणीं निरनिराळीं औषधें तयार होऊं लागलीं. अशा तऱ्हेचा खाजगी व छोट्या प्रमाणावर औषधी कारखाना सुरू करण्यामागें आयुर्वेदाचें शिक्षण देणारें 'आयुर्वेद महाविद्यालय' ही संस्था चालविण्यासाठी लागणारा खर्च या औषधविक्रीच्या फायद्यांतून भागवितां यावा असा त्यांचा हेतु होता. या औषधी शाळेची सारखी भरभराट होऊं लागली व १९३३ सालांत या खाजगी औषधी शाळेचें खाजगी लिमिटेड कंपनींत रूपांतर करणें जरूरीचें झालें व त्याप्रमाणें १९३३ सालीं ही खाजगी लिमिटेड कंपनी झाली. लिमिटेड कंपनी झाल्यास २५ वर्षें पुरीं झालीं असल्यानें सध्यांचा रौप्य-महोत्सव करण्यांत आला.

१९४७ सालांत या कंपनीचें पब्लिक लिमिटेड कंपनींत रूपांतर झालें. या कंपनीचें अधिकृत भांडवल १० लाखांचें असून विक्रीस काढलेलें भांडवल ५ लाखांचें आहे. १९५१ सालापासून या कारखान्यास बॉंडेड लॅबोरेटरी जोडण्यांत आली व तेव्हांपासून निरनिराळीं टिंक्चर्स, स्पिरिट्स् हीं ॲलोपॅथिक औषधें त्या ठिकाणीं तयार होऊं लागलीं आहेत. त्याचप्रमाणें निरनिराळ्या गोळ्या, सरबतें व इतर टिकाऊ मिश्रणें करण्याचा एक विभाग जोडण्यांत आला. त्यानंतर एका वर्षानें, म्हणजे १९५२ सालापासून, कंपनीनें स्वतःचा छापखाना सुरू केला. या छापखान्यांत कंपनीला लागणाऱ्या छपाईपैकीं जवळजवळ ९० टक्के छपाई आज केली जात आहे. फॉर्मसीव त्याला आनुषंगिक अशीं सर्व खातीं व यंत्रसामुग्री या कारखान्यांत आहे.

### संशोधनात्मक कार्य

आफालींत सध्यां आयुर्वेदिक औषधें आणि जवळजवळ १०० ॲलोपॅथिक औषधें तयार करण्यांत निपुण असलेले २५० कामगार काम करीत आहेत. आयुर्वेद आणि ॲलोपॅथी या पद्धतीमध्यें एकमेकांपासून घेण्यासारखें पुष्कळ आहे आणि त्या दृष्टीनें संशोधन करण्याचें कार्य या कारखान्यांत चालू आहे. आयुर्वेदाबाबत केलेल्या संशोधनकार्यांतूनच अनेक अत्यंत गुणकारी अशीं औषधें खास आयुर्वेदीय पद्धतीनें तयार होऊन बाहेर पडलीं आहेत.

हीं औषधें तयार करण्यासाठीं आधुनिक यंत्रांची योजना करून औषधांचे गुणधर्म वाढविण्याचा यशस्वी प्रयत्न या कारखान्यांत करण्यांत आला आहे. आयुर्वेदीय औषधी म्हणजे हातानें केलेल्या खडबडीत गोळ्या, कसल्या तरी ओबडधोबड बाटलींत घातलेले वनस्पतीचे काढे, अशी समजूत असावयाची व ती खरीहि असावयाची. पण रोग्याच्या पोटांत जाणारी औषधें हस्तस्पर्शविरहित व स्वच्छ असणें जरूरीचें आहे हें लक्षांत घेऊन या कारखान्यांत दळणें, वस्त्रगाळ करणें, वस्त्रगाळ भुकटीच्या गोळ्या करणें, फिल्टर करणें, इत्यादींसाठी लागणारीं यंत्रें बसविण्यांत आलीं आहेत. त्यामुळें वेळेंतहि बचत होते व अधिक उत्पादन शक्य होतें. त्याला शास्त्रीय शुद्धता प्राप्त होते.

### औषधांचा उच्च दर्जा

आफालीचीं कांहीं औषधें इतकीं लोकप्रिय झालीं आहेत कीं घरोघर त्यांचें वास्तव्य दिसून येतें. कास्फो, रक्तदोषांतक, कुमारी आसव, द्राक्षासव, च्यवनप्राश, मुकुल तेल, अशीं औषधें आज सर्वतोमुखीं झालेलीं आहेत आणि प्रत्येक घरांतून दिसून येतात. औषधें गुणकारी असलीं तरी तीं योग्य वेष्टनांत असलीं तरच त्याचा लोकांवर अधिक चांगला परिणाम होतो. त्याचप्रमाणें औषधें जशीच्या तशीं गिऱ्हाईकांच्या पदरांत पडण्यासाठी लागणारीं विशिष्ट तऱ्हेचीं झांकणें असणें आवश्यक आहे. या दोन्हीं बाबतींत आफालिनें आघाडी मारलेली दिसून येते. यामुळें या कारखान्यांतून बाहेर पडलेलीं औषधें आयुर्वेदीय वा ॲलोपॅथी हीं अत्यंत शुद्ध व वरच्या दर्जाचीं असतात.

### विक्रीचें अफाट क्षेत्र

या गुणामुळें आफालीच्या औषधांचा साऱ्या भारतांत खप आहे. मध्यप्रदेश, म्हैसूर, आंध्र, उत्तर प्रदेश, केरळ, राजस्थान, दिल्ली, बिहार, मुंबई, या सर्व राज्यांतून आफालीच्या विक्रीचें जाळें पसरलेलें असून भारतांत निरनिराळ्या राज्यांत एकूण १४ डेपो उघडण्यांत आले आहेत. प्रवासी विक्रेते, त्याचेवरचे इन्स्पेक्टर यांचेमार्फत भारतांत पसरलेल्या जवळजवळ २–२॥ हजार विक्रेत्यांशीं संबंध ठेवला जातो. आफालीचीं औषधें फक्त औषधविक्रेत्याकडेच मिळतात असें नाहीं, तर अनेक दुकानांतून तीं ठेवलीं जातात. १९३४–३५ सालांत या कंपनीची वर्षाची विक्री एक लाखाची होती. तिची सालोसाल वाढ होत गेली आहे. १९४४–४५ सालांत ती ७ लाखांची होती. १९५०–५१ सालांत १२। लाख, १९५४–५५ सालांत १५। लाख व १९५७–५८ सालांत या विक्रीचा आंकडा जवळजवळ २४ लाखांपर्यंत गेलेला आहे. विक्रीचें क्षेत्र वाढविण्याचे प्रयत्न सध्यांचे अधिकारी करीत असून सीलोन, पूर्व आफ्रिका, ब्रह्मदेश, इत्यादि परराष्ट्रांत माल पाठविण्याविषयीं वाटाघाटी चालू असून त्यांत यश आल्यास परदेशी चलन मिळविण्याच्या कामीं आफालि हातभार लावूं शकेल.

### आयुर्वेदाच्या प्रगतीसाठी २॥ लाखांची मदत

आफालीची एवढी वाढ झाली असली तरी आयुर्वेदाचा अभ्यास व्हावा, प्रगति व्हावी, असा प्रयत्न आफालीकडून सतत चालू आहे. आयुर्वेद सेवा संघ व आयुर्वेदाश्रम फार्मसीचे संस्थापक कै. गंगाधरशास्त्री गुणे यांनीं डोळ्यांसमोर ठेवलेलें ध्येय आजहि आफालीच्या व्यवस्थापकासमोर आहे. १९४६ सालापासून नगर येथील गुणेशास्त्री यांनीं सुरू केलेल्या आयुर्वेद महाविद्यालयास व रुग्णालयास सालीना २० हजार रुपये आफालि मदत देत आहे. गेल्या १२ वर्षांत जवळ जवळ २॥ लाख रु. आफालीनें या दोन संस्थांना दिले असून अडचणीच्याप्रसंगीं जादा मदतहि आफालीनें केलेली आहे. आयुर्वेदाचे शिक्षणाच्या कार्याला मदत देणें आणि आयुर्वेदिक औषधें तयार करणें व त्याचें संशोधन करणें हीं शास्त्रीबुवांचीं आवडतीं कामें आजहि ही फार्मसी करीत आहे ही अत्यंत आनंदाची व समाधानाची गोष्ट आहे.

# अर्थ

बुधवार, ता. १७ डिसेंबर, १९५८





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## औषधांच्या कारखान्यांसाठी रशियाची मदत

भारताला आयात कराव्या लागणाऱ्या वस्तूंत औषधांचा क्रमांक बराच वरचा लागतो. माणसाचें आरोग्य राखण्यासाठी औषधांची गरज असल्यामुळें, आणि अर्थोत्पादन आरोग्यावर अवलंबून असल्यामुळें औषधांची आयात जरूरीचीच ठरते. तथापि, ह्याहि बाबतींत स्वयंपूर्ण होण्याचे प्रयत्न करण्यांत येत आहेत. भारतांत आधुनिक औषधांचे ५ कारखाने काढण्यासाठी रशियानें ८ कोटी रुबल्सचें कर्ज देऊं केलेलें आहे. कारखान्याच्या जागा निश्चित करण्यासाठी सरकार लवकरच तज्ज्ञांची एक कमिटी स्थापन करणार आहे. निरनिराळया संभाव्य ठिकाणांना भेटी देऊन ह्या मुद्यासंबंधीचा आपला निर्णय कमिटीनें ६ महिन्यांत द्यावयाचा आहे. रशियाच्या तज्ज्ञांच्या साह्यानें हे कारखाने काढण्यांत यावयाचे असून प्रत्येक कारखान्याबद्दल वेगळा अहवाल त्यांच्याकडून मागविण्यांत आला आहे. सर्व अहवाल हातीं येण्यास पुढील वर्षाची अखेर होईल. रशिअन तज्ज्ञांनीं औषधांच्या निर्मितीसाठी जी योजना सादर केली आहे, ती संपूर्णपणें अंमलांत आणावयाची झाल्यास सुमारें ३९.५ कोटी रुपये भांडवल लागेल असा अंदाज करण्यांत आला आहे. औषधांचें स्वदेशी उत्पादन वाढविण्याचा सरकारचा इरादा असला, तरी पेनिसिलिनसारख्या औषधांचा वापर मोठ्या प्रमाणावर करण्यास उत्तेजन देण्यांत येणार नाहीं. दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अखेरीस संकल्पित सर्व कारखाने उत्पादन करूं लागण्याची शक्यता आहे. तसें झाल्यास ६० कोटी रुपयांचीं औषधें भारतांत तयार होऊं लागतील. जरूर लागल्यास रशियाकडून अधिक कर्ज मिळण्याची शक्यता आहे.

---

## खोल समुद्रांतील मच्छीमारीचा धंदा

केरळमध्यें नॉर्वेजिअन तज्ज्ञांच्या साह्यानें खोल समुद्रावर जाऊन मच्छीमारी करण्याच्या धंद्याचें शिक्षण देणारें एक केंद्र चालूं आहे. नॉर्वे हा देश अगदीं लहान असून त्याची लोकसंख्या अवघी ३५ लाखांच्या आसपास आहे. तरी सुद्धां तो देश औद्योगिक दृष्ट्या प्रगत झालेला आहे. युरोपखंडांत अणुशक्ति सिद्ध करणाऱ्या देशांपैकी तो असून त्याच्या कागदाच्या गिरण्यांना अणुशक्तीच्या साह्यानें चालना मिळत आहे. तथापि भारताच्या दृष्टीनें नॉर्वेकडून मिळूं शकणारी महत्त्वाची मदत वेगळ्या स्वरूपाची आहे. ह्या देशाला नौकानयन, मच्छीमारी आणि समुद्राची पहाणी करून नकाशे तयार करणें, ह्या कामांचा अनुभव कांहीं शतकांचा तरी आहे. नॉर्वेचे मुख्य प्रधान सध्यां भारताच्या दौऱ्यावर आहेत. त्यांनीं भारताला शक्य ती मदत देण्याचें आश्वासन दिलें आहे. तरीपण वरील तीन बाबतींत नॉर्वेचें साह्य भारताला विशेष उपयोगी पडण्यासारखें आहे. ह्या सर्वच बाबतींत भारत खूपच मागासलेला आहे. अजूनहि देशांतील मच्छीमारीचा धंदा बाल्यावस्थेंत आहे. मच्छीमारीच्या दृष्टीनें समुद्राचे योग्य प्रकारचे नकाशे झालेले नाहींत. त्याचप्रमाणें नौका बांधण्याची कलाहि मागासलेल्या अवस्थेंत आहे. अनेक प्रकारच्या बोटी बांधण्याची कला नॉर्वेंत चांगली प्रगत झालेली आहे. त्यांच्या ज्ञानाचा उपयोग भारताला चांगलाच होईल. त्याचप्रमाणें, तरुण खलाशांना नौकानयन व त्याच्या आनुषंगिक कामाचें शिक्षण देण्याऱ्या एखाद्या संस्थेचीहि अत्यंत आवश्यकता आहे. ह्या बाबतींत संयुक्त राष्ट्र–संघटनेकडून कांहीं साह्य मिळत असलें तरी नॉर्वेजिअन तज्ज्ञ तें अधिक चांगल्या तऱ्हेनें करूं शकतील.

---

## अविकसित देशांच्या प्रगतीचा मार्ग

भारताचे अमेरिकेंतील माजी वकील श्री. गगनविहारी मेहता ह्यांनीं 'आंतरराष्ट्रीय आर्थिक मदत' ह्या विषयासंबंधीं आपले विचार व्यक्त केले आहेत. मुंबई येथें एका प्रसंगीं बोलतांना ते म्हणाले कीं, जगांतील अविकसित देशांची आर्थिक प्रगति ही कांहीं केवळ आर्थिक आवश्यकतेची बाब राहिलेली नाहीं. राजकीय दृष्ट्या सुद्धां ती एक कसोटीची बाब झालेली आहे. आर्थिक विकास आणि स्वातंत्र्य ह्यांची सांगड कशी घालावी हा खरा प्रश्न आहे. अविकसित देशांना निपःक्षपातानें आर्थिक मदत मिळण्याची खात्री वाटली, तरच अशी सांगड घालतां येईल. अविकसित देशांची आर्थिक प्रगति घडवून आणण्यासाठी जितक्या भांडवलाची जरूरी आहे त्यापेक्षा प्रत्यक्ष उपलब्ध असलेलें भांडवल १५,००० कोटी रुपयांनीं कमी पडत आहे असा अंदाज करण्यांत आला आहे. ह्या देशांत गुंतविण्यासाठी खाजगी भांडवल पुढें येत नसल्यामुळें त्यांना आंतरराष्ट्रीय स्वरूपाच्या संस्थांच्या तोंडाकडे पहावें लागते. ह्या विषयाचा विचार करतांना जागतिक बँकेच्या कार्याकडे लक्ष वेधणें साहजिक आहे. कितीतरी देशांच्या मूलभूत विकासाच्या योजनांना बँकेनें साह्य दिलेलें आहे. भारतानें बँकेकडून सर्वांत अधिक कर्जें मिळविलेलीं आहेत. तथापि, ह्या बाबतींत थोडी सावधगिरी बाळगणें आवश्यक आहे. बाहेरून मिळणारी कोणतीहि मदत उपयुक्त ठरावयाची असेल तर मदत घेणाऱ्या देशानें आपली अंतर्गत अर्थव्यवस्था मजबूत राखली पाहिजे. तसें करण्यासाठी अर्थव्यवस्थेचें काळजीपूर्वक नियोजन करण्यांत आलें पाहिजे. कर्जांच्या परतफेडीची खरी हमी म्हणजे त्या त्या देशांतील उत्पादनाचा निर्देशांक, हें लक्षांत ठेवलें पाहिजे.

---

## कम्युनिस्ट राष्ट्रगटांतील उत्पादनवाढीचें आव्हान

रशिआ व चीन ह्यांच्या कम्युनिस्ट राष्ट्रगटांतील देशांचें औद्योगिक व शेतीचें उत्पादन झपाट्यानें वाढत असून आशिआंतील मागासलेल्या देशांना त्यामुळेंच कम्युनिझमचें आकर्षण अधिक जोरानें वाटूं लागेल, असा आंतरराष्ट्रीय निरीक्षकांचा अंदाज आहे. पश्चिमात्य राष्ट्रांना हें एक आव्हानच आहे. कारण, त्यांचें उत्पादन कम्युनिस्ट राष्ट्रगटांच्या गतीनें वाढत नाहीं.

त्यांच्या वाढत्या उत्पादनाबरोबर मागासलेल्या राष्ट्रांना ते अधिक तांत्रिक व आर्थिक मदत देऊं लागतील आणि मग त्यामधून राजकीय ओढहि निर्माण होण्याचा धोका ह्या निरीक्षकांना दिसत आहे. १९५६ सालीं रशिआच्या व पूर्वयुरोपीय देशांच्या अर्थव्यवस्था मोठ्या अडचणींत सांपडलेल्या होत्या. पण, आतां त्या चांगल्या सावरल्या आहेत. रशिआपेक्षाहि चीनमध्यें होत असलेल्या उलथापालथीमुळें फार दूरगामी परिणाम होणार आहेत. चीनमधील अवाढव्य लोकसंख्येचा चिनी सरकार भरपूर उपयोग करून घेत आहे. असंख्य बेकारांना सरकारनें शेतींत व वाहतूकव्यवस्थेंत सामावून घेतलें आहे. पण त्यांच्या जीवनमानांत मात्र फारशी सुधारण घडवून आणलेली नाहीं. ग्रामीण भागांत निरुपयोगी असलेल्या हजारों शेतकऱ्यांचा कसा उपयोग करून घ्यावा हें अद्याप कोणत्याहि लोकशाही अगर हुकूमशाही देशाच्या सरकारला नीटसें समजलेलें नाहीं. पण चीनच्या कम्युनिस्ट सरकारनें ह्यांतून यशस्वीपणें मार्ग काढलेला दिसत आहे. शेतकऱ्यांच्या सहकारी संस्था स्थापण्यांत आलेल्या आहेत. पण त्यांच्या कामाची दिशा व वेग मात्र वरून आलेल्या हुकुमानें ठरतात. विकासाच्या कामामुळें चलनवृद्धि होते व कामाचा व्याप आखडतां घ्यावा लागतो. पण, चीनमध्यें तसें झालेलें दिसत नाहीं.

---

## नगर जिल्ह्यांतील साखर कारखाने

### एक वर्षांत ७॥ लाख पोतीं

अहमदनगर जिल्ह्यांत ५ सहकारी साखर कारखाने असून त्यांपैकी तीन गेल्या हंगामांतच सुरू झाले आहेत. १९५७–५८ च्या हंगामांत या कारखान्यांनीं ७,४१,२६३ पोतीं साखर तयार केली आहे. १९५० सालीं सुरू झालेल्या प्रवरानगर कारखान्यानें आपल्या सभासद–शेतकऱ्यांना उसास सर्वांत जास्त म्हणजे ४६–१४–० रु. भाव दिला आणि सर्वांत अधिक म्हणजे २,२०,७०२ पोतीं साखर तयार केली. कोपरगांव सहकारी साखर कारखान्यानें एकरीं ४७ टन ऊंस काढला आणि त्याचें साखरेचें प्रमाण शें. ११·३७५ पडलें. पांच कारखान्यांचे मिळून ५,२३८ सभासद आहेत.

| | कामाचे दिवस | गाळलेला उस | साखर पोतीं तयार |
|---|---|---|---|
| प्रवरानगर | १७७ | २,०८,०९१ | २,२०,७०२ |
| कोपरगांव | १८१ | १,७७,१०२ | २,०१,३०१ |
| राहुरी | १४६ | १,२५,५९४ | १,२७,०४९ |
| राहाता | १३५ | १,०६,४४२ | १,०७,५६५ |
| कारेगांव | १३७ | ९६,४०६ | ९१,६५६ |

**ऐतिहासिक इमारतीकडे दुर्लक्ष**—आंध्र प्रदेशाची राजधानी हैदराबाद, येथें 'चार मिनार' ह्या नांवाची प्रसिद्ध इतिहासकालीन इमारत आहे. ही इमारत भारत सरकारनें ऐतिहासिक रक्षित स्मारक म्हणून जाहीर केलेली आहे. तरीसुद्धां तिची योग्य ती व्यवस्था ठेवण्याच्या कामीं दुर्लक्ष होत आहे अशी तक्रार हैद्राबादच्या मेअरनीं केली आहे.

**कापसाच्या वापरांत घट**—ऑगस्ट ३१ अखेर संपणाऱ्या कापसाच्या हंगामांत भारतामधील कापडाच्या गिरण्यांनीं वापरलेल्या हिंदी कापसाच्या वापरांत मागील वर्षाच्या हंगामाशीं तुलना करतां २ लाख गांसड्यांची घट झालेली दिसून आली. परदेशी कापसाच्या वापरांतहि ४,००० गांसड्यांची घट झालेली आहे.

## दि इंडियन बँक लि., मद्रास

दि इंडियन बँक लि., मद्रास, ह्या सुप्रसिद्ध बँकेनें पुणें येथें बुधवार पेठेंत नगर वाचन मंदिराशेजारीं आपली शाखा उघडली आहे. बँकेच्या १३४ कचेऱ्यांत आतां आणखी एका कचेरीची भर पडली आहे.

१५ ऑगस्ट, १९०७ रोजीं स्थापन झालेल्या ह्या बँकेचें वसूल भांडवल ६६,१९,६२५ रु. असून शेअर वाढाव्याचे पोटीं ३१,१७,३०० रु. आहेत. रिझर्व्ह व इतर फंड ह्यांत ६०,४४,५८३ रु. आहेत. ठेवींची रक्कम ३८ कोटी रुपयांपेक्षां जास्त असून एकूण ताळेबंद ४६ कोटी रुपयांचा आहे. बँकेनें २१½ कोटी रुपयांचीं कर्जे दिलेलीं आहेत. रिझर्व्ह फंड व शेअरवाढावा ह्यांची रक्कम वसूल भांडवलापेक्षां जास्त आहे. १९२६ हें वर्ष सोडलें तर बँकेनें भागदारांना दरसाल सरासरीनें १०% पेक्षा जास्त डिव्हिडंड दिलेलें आहे. गेल्या वर्षी, सुवर्ण महोत्सवानिमित्त १२% + २% डिव्हिडंड देण्यांत आलें.

बँकेची मुख्य कचेरी नॉर्थ बीच रोड, मद्रास, येथें आहे. एकट्या मद्रास शहरांतच बँकेच्या २३ शाखा आहेत. बाकीच्या भारतांतील सात राज्यांतून पसरलेल्या आहेत; ४ कचेऱ्या मलायांत (सिंगापूर, मलाक्का, कोलालंपूर व पेनांग) आणि १ सिलोनमध्यें (कोलंबो) आहे. बँकेचें फॉरिन एक्सचेंज खातें वाढविण्यांत आलेलें आहे. वेस्टमिन्स्टर बँकेकडे लंडनमधील प्रतिनिधित्व असून न्यूयॉर्कमध्यें फर्स्ट नॅशनल बँक ऑफ न्यूयॉर्ककडे प्रतिनिधित्व आहे.

इंडियन बँक सर्व प्रकारचा बँकिंगचा व्यवहार करते. तिच्या १३५ ठिकाणच्या कचेऱ्यांमुळें, गिऱ्हाइकांना बँकिंगच्या जास्तींत जास्त सोई व सवलती मिळणें शक्य होतें. चालू आणि कॉल व मुदती ठेवी बँक स्वीकारते. तीन वर्षांचीं तिचीं कॅशसर्टिफिकिटें आहेत. सेव्हिंग बँक खात्यांतील रकमेवर २½% व्याज मिळतें आणि आठवड्यांतून तिनदां चेकनें पैसे काढतां येतात.

श्री. सी. एस. नागराज राव साहेब, बी. ए., बी. एल्. हे पुणें शाखेचे एजंट म्हणून आले आहेत.

**बँकेचा ३०–६–५८ अखेरचा संक्षिप्त ताळेबंद**

| | रु. | | रु. |
|---|---|---|---|
| वसूल भांडवल | ६६,१९,६२५ | कॅश | ३,४५,५७,४०९ |
| शेअर प्रीमिअम | ३१,१७,३०९ | इतर बँकांत | ७२,४१,७२३ |
| रिझर्व्ह व इतर फंड | ६०,४४,५८३ | कॉलमनी | ५,२६,८२,९१३ |
| | | इनुव्हेस्टमेंटस् | ९,८५,९१,५२३ |
| ठेवी | ३८,००,९६,४१५ | कर्जे | २१,५४,६१,६६१ |

**निर्यातीसाठी करांत सवलती**—कातडी व कातड्याच्या वस्तू ह्यांची निर्यात वाढविण्यास उत्तेजन देण्याच्या हेतूनें भारत सरकार प्राप्तीवरील करांत खास सवलती देण्याचा विचार करीत आहे. मात्र ह्या वस्तूंची निर्यात करणाऱ्या व्यापाऱ्यांना निर्यातीसंबंधीं कांहीं हमी द्यावी लागेल, अशी माहिती लोकसभेंत व्यापारमंत्र्यांनीं सांगितली.

**पश्चिमवाहिनी नद्यांची पाहणी**—म्हैसूर व मुंबई राज्यांतील पर्वतावरून पश्चिमेकडे वाहणाऱ्या नद्यांचे प्रवाह पूर्वेकडे वळवून त्यांचा उपयोग करतां येईल कीं नाहीं हें पाहण्यासाठी भारत-सरकारनें विमानांतून फोटो घेऊन पाहणी केली आहे. ह्या नद्या पश्चिमेला असणाऱ्या अरबी समुद्राला मिळतात. पर्वताच्या उतारावरून जलद वाहून जाणाऱ्या त्यांच्या पाण्याचा फारसा उपयोग होत नाहीं.

# आपलें मोल

## आर्थिक सिद्धांत दैनंदिन राहणीस लावून पहा !

लेखक :—श्री. वा. काळे,

शास्त्रीय शोध आणि यंत्रांचा उपयोग, ह्यांच्यामुळें शेतीचें व कारखान्यांचें उत्पादन आतां खूपच वाढलें आहे. जगांतील सर्वच देशांतून ही उत्पादनवाढ दिसून येते; कांहीं देशांत तर ती फारच मोठ्या प्रमाणावर होत आहे. नव्या नव्या जिनसा आतां तयार होत आहेत आणि त्यामुळें आपल्या सुखयोयींत भर पडत आहे. वार्यां जाणाऱ्या गोष्टीपासून उपयुक्त जिनसा बनविल्या जात आहेत; नैसर्गिक जिनसा महाग व गैरसोईच्या पडतात तेथें त्यांची जागा कृत्रिम पदार्थ घेऊं लागले आहेत. खेड्यांच्या मानानें शहरांत आणि मागासलेल्या देशाच्या मानानें पुढारलेल्या देशांत कितीतरी नव्या नव्या जिनसा व सोई आढळून येतात : तथापि जिनसा नव्या दिसल्या, त्यांची संख्या वाढली, तरी त्यांत शास्त्रीय दृष्टीनें निर्मिति कांहींहि नसते. मानवाला ह्या सृष्टींत नव्यानें असें कांहींहि निर्माण करतां येत नाहीं. जिनसांचा मूळ आकार, रूप, रचना, इत्यादि बदलून त्यांच्यांत नवी उपयुक्तता निर्माण करणें किंवा जुनी वाढविणें एवढेंच त्याच्या हातीं असतें. आपली कितीहि आर्थिक व औद्योगिक प्रगति होवो; आपण निर्मितीची भाषा वापरण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाहीं. उत्पादन आणि नाश हे शब्द एकाच क्रियेचीं दोन अंगें व्यक्त करतात. जेव्हां एकाद्या गोष्टीचें उत्पादन होतें असें आपण म्हणतों, तेव्हां तितक्याच वजनाच्या दुसऱ्या गोष्टीचा नाश होत असतो; जेव्हां नाश होतो तेव्हां त्याच मापाचें उत्पादन होत असतें. पदार्थविज्ञानशास्त्राचा हा अगदीं मूलभूत सिद्धांत आहे. पाण्यांतून विजेचा प्रवाह नेला, म्हणजे पाण्याचें हैड्रोजन व ऑक्सिजन वायूंत रूपांतर होतें; पाणी हें द्रवस्वरूपांत उरत नाहीं. ह्या दोन वायूंपासून पुनः पूर्ववत् पाणी निर्माण करतां येतें. हा प्रयोग आपल्याला घरींसुद्धां करतां येईल. एखादा पदार्थ आपण जाळला, तर त्याची राख खाली उरते; कांहीं भाग वायुरूप होतो. ह्या सर्वांचें वजन मूळ पदार्थाइतकेंच भरतें, हें प्रयोगानें सिद्ध करतां येतें. म्हणजे आपण ज्याला उत्पादन म्हणतों, तें निर्मितिवाचक नसून नव्या उपयुक्ततेचा त्यांत भाग असतो एवढेंच. थोड्या उपयुक्ततेऐवजीं जास्त उपयुक्तता घालणें, ह्यासच उत्पादन असें म्हणावयाचें.

### उपयुक्तता कशी वाढवावी ?

खाणींतला कोळसा खणून काढला आणि तो एंजिनांत जाळला, म्हणजे जी शक्ति मिळते, तिच्या साह्यानें आगगाड्या चालवितां येतात. गिरण्यांचीं यंत्रें फिरवितां येतात. तेलाच्या खाणींतील तेल उपसून तें शुद्ध केलें म्हणजे त्याच्या साहाय्यानें मोटारी व विमानें चालवितां येतात. उंचीवरील पाणी नळांतून खाली आणून त्याच्या गतीनें वीज तयार करतां येते; ह्या विजेचे उपयोग तर असंख्य आहेत. सिमेंट, खडीचे कच, वाळू, पोलादी सळ्या, ह्यांच्या मिश्रणानें प्रचंड इमारती उभारतां येतात, घरणें बांधतां येतात. अन्न, वस्त्र, निवारा इत्यादींसाठी नानाप्रकारें उपयुक्तता वाढविलेल्या जिनसांचा उपयोग केला जातो. खतांच्या मुळें दर एकरीं पीक अधिक येतें. जंतुनाशक द्रव्यांमुळें नासधूस थांबते; वेगवेगळ्या नैसर्गिक व कृत्रिम तंतूंपासून वस्त्रें विणलीं जातात. ह्या सर्व जिनसा आपण डोळ्यांनीं पाहतों; त्यांना स्पर्श करूं शकतों. शारीरिक गरजा भागविणाऱ्या जिनसा बहुधा ह्याच स्वरूपाच्या असतात.

मानवाच्या प्राथमिक अवस्थेंत, त्याची प्राप्ति बेताची असतांना, त्याच्या गरजाहि थोड्या असतात. अन्न, वस्त्र आणि निवाऱ्याची जागा ह्यांसच प्राधान्य असतें. त्याची प्राप्ति वाढली म्हणजे त्याच्या गरजाहि वाढतात आणि त्यांचें स्वरूपहि पालटत जातें. पावसांत भिजत जाणारा मनुष्य डोक्यावर पोतें घेतो, पुढें छत्री वापरतो, रेनकोट आणि हॅट घालूं लागतो. पायांचें गमबुटांनीं संरक्षण करूं लागतो. पायीं प्रवास करणारा बैलगाडी, टांगा, बस, टॅक्सी, अशीं वहानें वापरूं लागतो. खाद्य-पेयांत विविधता येऊं लागते. घरांतील सोई वाढूं लागतात. राहणीचा दर्जा सुधारूं लागतो. ज्या गोष्टी पूर्वी चैनीच्या समजल्या जात होत्या, त्या गरजेच्या भासूं लागतात. उन्हाळयांत बर्फाचा खप कितीतरी वाढला आहे. विजेचे पंखे घरोघर झाले आहेत. लोण्याच्या दुकानांतून रेफ्रिजरेटर्स आले आहेत. टेलिफोन ही अजब चीज उरलेली नाहीं. वृत्तपत्रें, पुस्तकें, रेडिओ, सिनेमा, खेळ, प्रवास, शिक्षण, धूम्रपान, फुलें, सुगंध, इत्यादीं-वरील वाढता खर्च सर्वांच्या परिचयाचा आहे. मानसिक व बौद्धिक भुकांस अधिकाधिक महत्त्व प्राप्त होत चाललें आहे. साहित्य, संगीत, कला, ह्यांत मनुष्य रमूं लागतो. शिष्टाचार पाळूं लागतो. त्यांतून नवीं सामाजिक मूल्यें निर्माण होतात. संपत्तीचे प्रकार वाढले म्हणजे त्यांच्या अभावामुळें मनस्तापहि जास्त होऊं लागतो. आपल्या मुलीला कॉनव्हेन्ट स्कूलमध्यें किंवा नृत्याच्या क्लासमध्यें घालतां आलें नाहीं, म्हणून कित्येक आई-बाप कष्टी झालेले आपण पाहतोंच. चैनींच्या गोष्टींचें गरजांत


**आगामी वर्षासाठी योग्य उपक्रम**

आर्थिक व्यवहार समाधानकारक करण्यासाठी आपलें खातें योग्य बँकेंत ठेवणें महत्त्वाचें आहे. प्रतिष्ठित परंपरा, सुरक्षितता व बँकिंगच्या आधुनिक सोयी यांसाठीं—

**दि बँक ऑफ महाराष्ट्र लि.**

(स्थापना १९३५ : शेड्यूल्ड बँक)

या बँकेचे आपण खातेदार होऊन आर्थिक सहजीवन अनुभवा.

—भांडवल—

वसूल भांडवल ( भागापोटीं आगाऊ जमा झालेल्या रकमा धरून ) रु. २६,००,०००चे वर

गंगाजळी व इतर निधि ...रु. ११,५०,०००

एकूण खेळतें भांडवल ...रु. अकरा कोटींचे वर

—व्याजाचे दर—

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँकखातीं | :: | द. सा. द. शें. २ टक्के |
| स्पेशल सेव्हिंग्ज बँक | :: | ,, ,, २॥ टक्के |
| चालू खातीं | :: | ,, ,, ½ टक्का |

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

विशाल महाराष्ट्रांत व इतरत्र ४४ शाखा.

मुख्य कचेरी, थोरले बाजीराव रस्ता, पुणें २.

चिं. वि. जोग
मॅनेजर

रूपांतर होऊं लागलें आणि त्या भागल्या नाहींत, म्हणजे जिणें व्यर्थ वाटण्यापर्यंत मजल पोंचते !

### गरजा आणि मालाचा पुरवठा

गरजा कितीहि वाढोत; त्या भागविण्यासाठी नव्या नव्या उपयुक्ततेनें युक्त अशा जिनसांचें जें उत्पादन केलें जातें त्यांच्या छाननींत फक्त तीनच प्रकार आढळतात:—(१) जिनसांतील घटकांची रचना बदलली जाते; गुणधर्मांत बदल करून त्यांचा आकार, रंग, वजन, चव, वास इत्यादींत फरक करून तोच जिन्नस नव्या स्वरूपांत अधिक उपयुक्त केला जातो. (२) जिनसांचें स्थलांतर केल्यानेंहि त्यांची उपयुक्तता वाढते. उदाहरणार्थ, अमेरिकेंत जो गहूं वायां जातो, तो भारतांत हवासा असतो; या गव्हामुळें लक्षावधि लोकांची उपासमार टळूं शकते. आसाम व निलगिरी येथील मळयांतला चहा दूरदूरच्या राज्यांत व देशांत पाठविला जातो. (३) केवळ कालमाहात्म्यामुळेंहि तोच जिन्नस कालांतरानें जास्त किंमतीचा ठरतो. पोस्टाचीं जुनीं तिकिटें हजारों रुपयांना विकलीं जातात. जुनीं नाणीं, दुर्मिळ चित्रें व ग्रंथ इत्यादींचेंहि असेंच होतें. जंगलांतलीं झाडें आणि मेंढ्यांचे कळप आपोआप वाढत असतात. मोसमांत भरपूर पुरवठा असणाऱ्या मालाला मागाहून भरपूर किंमत येते; त्याकरितां मालाची सांठवण करण्यांत येते. ह्या सांठेबाजीचें स्वरूप आतां सर्वांच्या पूर्ण परिचयाचें आहे. शेतकरी, कारखानदार, व्यापारी ह्या सर्वांच्या कामाचें स्वरूप अशा प्रकारचें आहे. रेल्वे, आगबोटी, विमा कंपन्या, बँका, टपालखातें ह्या सर्वांचा उपयोग त्यांना होत असतो. उपयुक्तता वाढविणें हाच सर्वांचा उद्देश असतो. जिनसांची उपयुक्तता वाढली कीं त्याला मागणी जास्त येते व किंमतहि अधिक मिळते. अशा प्रकारें जास्त किंमत मिळविण्याचा प्रत्येकाचा प्रयत्न असतो; तो मग डोक्याचें काम करणारा कायदेपंडित असो कीं हातानें राबणारा मजूर असो. जिनसांचें उत्पादन कारखान्यांत चालतें, तें डोळयांत सहज भरतें; पण रानांत वायां जाणारीं करवंदें शहरांत आणून विकणाराहि "रानांतली मैना" शहरवासीयांना उपलब्ध करून एकप्रकारें उत्पादनच करीत असतो. बेलाचीं पानें देवपूजेसाठीं शहरांत विकलीं जातात. वाराणशी किंवा प्रयाग येथें नकोसें झालेलें गंगोदक परस्थांना विकत घेऊन देवघरांत ठेवावेसें वाटतें. नदींतील वाळू दूरवर वाहून नेली जाते. भारतांत उपद्रव करणारीं माकडें मारणारांना पैसे मिळतात; तींच माकडें अमेरिकेंत पाठविलीं तर पैसे मिळवून देतात. १९५७–५८ च्या पहिल्या सात महिन्यांत भारतानें १,२८,२६१ माकडांची निर्यात करून ८६ लक्ष रुपयांची कमाई केली. ह्या माकडांची वाहतूक विमानानें झाली ! डबाबंद खाद्यपदार्थांचा धंदा चालतो, त्याचें कारण मोसमाबाहेर आणि दूरच्या ठिकाणीं ते पदार्थ उपलब्ध करून दिले म्हणजे त्यांना किंमत येते, म्हणूनच पुण्यांतील नवरे हवेत म्हणून दूरदूरच्या ठिकाणचे आई-बाप पुण्यांतील सामान्य स्थळांच्या मागें लागतात; पण पुण्यांतील चाणाक्ष आई-बाप दूरच्या ठिकाणचीं स्थळेंच आपल्या मुलींसाठी निवडतात. ह्याचें कारण पुण्याच्या मुलींचा भाव परप्रांतांत जास्त असतो !

### द्रव्यार्जनाचे कांहीं व्यावहारिक सिद्धांत

व्यवहाराचे हे सिद्धांत आपण अर्थोत्पादनासाठीच, नव्हे, तर रोजच्या जीवनांतहि पदोपदीं, कळत न कळत अंमलांत आणीत असतों. गृहिणी वायां जाणाऱ्या शेणाचे गोळे किंवा गोवऱ्या बनवून त्यांचा जळणाकडे उपयोग करते. फाटक्या कपड्याचे


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक लि.

स्थापना : १९१८] सारस्वत बँक गृह, मुंबई ४ [टेलिफोन २७०१४

—दरमहा १ ते १०० रुपये नियमित बचतीकरितां—

रिकरिंग डिपॉझिट खातें आजच उघडा — व्याज ३॥ ते ४ टक्के

: बँकेच्या शाखा :

फोर्ट, दादर, वरळी, माहिम, पुणें, बेळगांव ★ महिला शाखा : सारस्वत बँक गृह, मुंबई ४.

५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी

लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टीची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था

समासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.

क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

आगामी प्रकाशन

મધુમાલતીનું સૌંદર્ય

मूळ लेखक :
श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"

गुजराती अनुवादक :
प्रा. शशिन् ओझा, एम्. ए.

प्रस्तावना :
लेडी प्रेमलीलाबेन ठाकरसी
उप-कुलगुरु, श्री. ना. दा. ठाकरसी महिला विद्यापीठ.

घडके भाग कापून घेऊन त्यांचे कामचलाऊ कपडे शिवले जातात. फाटक्या पँटच्या गुढघ्याखालचा भाग पिशव्या तयार करण्यास उपयोगी पडतो. जुन्या चिंध्यांची उबदार गोधडी बनवितां येते. धान्याचें पिठांत रूपांतर करून त्याची भाकरी-पोळी केली जाते; भाजी उकडून तोंडीं लावणें बनविण्यांत येतें. हे सर्व उत्पादनाचेच प्रकार आहेत. आमच्या सरस्वतीबाईच्या घरीं गुलाबाला पुष्कळ फुलें येतात; त्याचा त्या गुलकंद करून ठेवतात. लोणचीं, पापड, मुरंबे, सरबतें, हीं सर्व त्याच प्रकारांत बसतात. ह्या सर्व बाबतींतील तत्त्व एकच आहे; उपयुक्तता वाढविणें, ती टिकवणें. प्रत्येक घरांतून अशा प्रकारें उत्पादन चालूं आहे. ज्या प्रमाणांत तें यशस्वी होईल, त्या प्रमाणांत तें घरांतील सुखांत व समाधानांत भर घालील; अपुऱ्या प्राप्तीची गैरसोय कमी करील; नवा आनंद प्राप्त करून देईल. अगदीं गरीबापासून श्रीमंतापर्यंत हें तत्त्व लागूं आहे; प्रकारांत काय तो फरक.

### कांहीं माणसें अधिक हवींहवींशीं कां वाटतात ?

जिनसांची उपभोग्यता व त्यांची किंमत, ह्या दृष्टीनें हा विचार झाला. पण हे सिद्धांत जिनसांच्या ऐवजीं मानवालाच आपण लावून पाहिलें, आपल्याला स्वतःची उपयुक्तता कशी वाढवितां येईल व त्यामुळें इतरांना उपयोगी कसें पडतां येईल याचा विचार केला, तर आपल्याला एक नवीनच दृष्टिकोन प्राप्त होईल. उपयुक्ततेंत वाढ झाली कीं मोलहि वाढतें; अधिक उपयुक्त मनुष्य अधिक हवासा होतो आणि उपयुक्ततेचा दर्जा जेवढा उच्च, तेवढें त्याचें सामाजिक महत्त्वहि अधिक. माणसानें अशा तऱ्हेनें आपल्या उपयुक्ततेंत वाढ केली, इतरांच्यांत जी उपयुक्तता नाहीं ती स्वतःमध्यें आणली, म्हणजे सहाजिकच त्याला किंमत प्राप्त होते. आर्थिक उलाढालींत, बाजारांत, जास्त किंमत यावी यासाठी सर्व खटाटोप करण्यांत येतो; मानवानें आपली उपयुक्तता वाढविण्याची, ती एवढ्या स्वार्थी हेतूनें नव्हे; स्वतःच्या समाधानासाठी. लोक त्याला मानूं लागले, त्याला विशेष महत्त्व प्राप्त झालें, तर तें आनुषंगिक समजलें पाहिजे. अर्थात् चांगुलपणाचें चीज झालें, तर तें कुणाला आवडणार नाहीं ? जिनसा-जिनसांत कांहीं जिनसा अधिक उपयुक्त म्हणून मौल्यवान् ठरतात. सर्वच घड्याळें वेळ दर्शवितात; पण आकारानें लहान, जाडीला कमी, पाण्याला दाद न देणारें, धक्का खाल्ला तरी न डगमगणारें, रात्रींहि वेळ सांगणारें, घड्याळ अधिक मौल्यवान् ठरतें. तद्वतच, माणसा-माणसांतहि कांहीं माणसें अधिक गुणवान् म्हणून जास्त हवींशीं असतात. कोणत्याहि माणसाला आपली उपयुक्तता गुणांत वाढ करून निश्चित जास्त करतां येते. बँकेंतील कारकून बँकिंगच्या परीक्षा देऊन पगारवाढ मिळवितो; तद्वतच सामाजिक जीवनांतहि घडतें. वेगवेगळ्या परीक्षांना उतरणारा मनुष्य इतरांना प्रिय होतो; प्रत्यक्ष पगार वाढीपेक्षांहि उच्च दर्जाचा आनंद त्याला लाभतो. इतरांची गरज जितक्या वरच्या दर्जाची भागवितां येईल, तितका तो जास्त उपयुक्त ठरतो.

### प्रावीण्यापेक्षा व यशापेक्षा गुणाला विशेष महत्त्व

सुसंस्कृत समाजांतील मूल्यें ओळखून तीं स्वतःमध्यें प्रकर्षानें आणणाराला समाजांत खूपच मानाचें स्थान मिळतें. शारीरिक स्वच्छतेपासून मानसिक शुचितेपर्यंत सर्व गोष्टींचा त्यांत समावेश होतो; व्यक्तिमत्त्व वाढविण्याचाहि त्यांत अंतर्भाव आहे. किरकोळ गोष्टींतहि आपण इतरांच्यापेक्षा सरस असणें व दिसणें ही बाब


## दि बॉम्बे स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

९, बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई-१.
( स्थापना : १९११ )
चेअरमन : श्री. रमणलाल जी. सरैय्या, ओ. बी. ई.
ह्या बँकेंत गुंतविलेला पैका हिंदी शेतकरी व सहकारी संस्था ह्यांना साहाय्यकारक होतो.

भरपाई झालेलें भाग भांडवल :
भागीदारांतर्फे रु. ४४ लक्ष
मुंबई सरकारतर्फे रु. ८१ लक्ष
रु. १ कोटी, २५ लक्ष
गंगाजळी व इतर फंड : रु. ५३ लक्ष
एकूण ठेवी : रु. १२ कोटी
खेळतें भांडवल : रु. २४ कोटींचे वर
१० जिल्ह्यांमध्यें व मुंबई उपनगरांत मिळून ४३ शाखा

भारतांतील सर्व प्रमुख शहरीं कलेक्शनची व्यवस्था. सर्व तऱ्हेचीं बँकिंगचीं कामें केलीं जातात. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

जी. एम्. लाड
मॅनेजिंग डायरेक्टर.



स्थापना १९३६

## युनायटेड वेस्टर्न बँक, लिमिटेड, सातारा

[ शेड्यूल्ड बँक ]

हेड ऑफिस—पॅलेस स्ट्रीट, चिरमुले निकेतन, सातारा.
शाखा—मुंबई फोर्ट, मुंबई गिरगांव, पुणें, नासिक, बार्शी, लोणंद, कोल्हापूर व हलकर्णी

ता. ३०-६-५७ अखेर

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | १०,००,००० |
| वसूल भांडवल | रु. | ६,५०,००० |
| रिझर्व व इतर फंडस् | रु. | ३,०३,००० |
| ठेवी व इतर फंडस् | रु. | १,१५,००,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. | १,४०,००,००० |

मुदत ठेवीवरील व्याजाचे दर :

| १ वर्ष ते दोन वर्षे | तीन वर्षे | ५ वर्षे |
|---|---|---|
| रु. ३-०-० | रु. ३-४-० | रु. ३-८-० |

दहा अगर अधिक वर्षें रु. ४-०-० (चार फक्त)

| | | |
|---|---|---|
| सेव्हिंग्ज बँक | दरसाल दर शेंकडा | २-०-० |
| सेव्हिंग्ज डिपॉझिट | ,, | १-८-० |
| चालू डिपॉझिट | ,, | ०-८-० |

सेव्हिंग्ज बँक व से. डिपॉझिट खात्यावर नवीन आकर्षक नियम तयार केले असून व्याजाचे दरांतहि वाढ केली आहे. त्याबद्दलची सविस्तर माहिती आमचे कोणत्याहि शाखेत समक्ष मिळूं शकेल.

*सर्व तऱ्हेचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.*

सी. ह. जोशी, बी. ए., बी. कॉम्., मॅनेजर.
शं. ह. साठे, बी. ए., एलएल. बी., चेअरमन

महत्त्वाची ठरते. "दिसण्या"पेक्षा "असणें" केव्हांहि अधिक आवश्यक आहे. दुसऱ्याच्या शारीरिक गरजेपेक्षा मानसिक गरजा पुरविणाराला नेहेमींच अग्रस्थान मिळतें. प्रसन्न चेहरा, गोड वाणी, सुदृढ व डौलदार शरीर, अशा वेष्टनांत सहृदयता आणि विवेक वास करीत असतो आणि त्या सर्वांस कार्यक्षमतेची जोड असेल, तर त्या संयोगाची सर एकाद्याच बाबतींत विशेष प्राविण्यास कधींच येणार नाहीं. गुणसमुच्चयामुळें जिनसाला दर्जा प्राप्त होतो, त्याचप्रकारें माणसाच्या बाबतींतहि होतें. यशस्वी माणसाला अशाच गुणसमुच्चयाची आवश्यकता असते.

जिन्नस उत्कृष्ट दर्जाचा असला, तरी त्याचें महत्त्व योग्य वेळेवर व स्थानावर अवलंबून असतें. उदाहरणार्थ, चांगल्या मालाचा पुरवठा फाजील झाला, तर त्याला वाजवी किंमत येत नाहीं; त्याच्या गुणांचें चीज होऊं शकत नाहीं. त्याची इतरांना गरजच नसते. माणसानेंहि आपल्या गुणांचा वापर प्रसंगानुरूपच केला पाहिजे; नाहींतर गुणांची माती होऊन जाते. जेथें हजारों माणसें जमणार आहेत तेथें जाण्याची धडपड करण्यांत कांहींच अर्थ नसतो. पण जेथें जरूरी आहे, पण माणसांचा तुटवडा आहे, अशा वेळीं आपण होऊन पुढाकार घेऊन इतरांना उपयोग होऊं दिला पाहिजे. मेजवानीच्या वेळीं गैरहजर राहिला तरी चालेल. स्मशानांतील कामगिरी मात्र बजावण्यांत कसूर उपयोगी नाहीं. तरुणांनीं खांदा दिलाच पाहिजे; नुसता चेहरा दाखविण्यासाठी जातां कामा नये. सुशीलाबाईंच्या मैत्रिणीचे यजमान इस्पितळांत अत्यवस्थ स्थितींत होते, तेव्हां त्यांना भेटायला यावयाला सकाळीं व संध्याकाळीं रीघ लागावयाची. इतके लोक न आलेले बरें, असें त्यांना होऊन गेलें. पण दुपारीं बारा ते तीन त्या मैत्रिणीला अतिशय जड जावयाचें. सुशीलाबाई नेमक्या ह्याच वेळीं इस्पितळांत जात असत; मैत्रिणीची नेमकी गरज त्यांनीं ओळखली व भागविली!

### काळवेळाचें व प्रसंगाचें तारतम्य

क्रिकेटच्या सामन्यांत धांवांचा डोंगर रचला गेल्यानंतर शतक काढण्यापेक्षा, इतर खेळाडूंचे त्रिफळे उडालेले असतील त्यावेळीं संघाची बाजू जो सावरतो, तोच खरा तारक ठरतो; त्याचाच गौरव होतो. त्याच्या धांवांची संख्या फार मोठी नसली, तरी त्याची कामगिरी मोलाची असते. अरसिकांना कवित्व ऐकविणारा मूर्ख ठरतो; पण जाणकरांच्या समुदायांतील तेंच कार्य त्याला श्रेष्ठस्थानीं नेऊन बसवितें. दुसऱ्याला द्यावयाचा सल्ला फार आधीं नाहीं आणि फार उशिराहि नाहीं अशावेळीं दिला तरच तो मानवतो, आणि सल्लागाराच्या कामगिरीचें चीज होतें. प्रत्येकच गृहिणी दररोज आमटी करीत असते. प्रत्येकीच्याच पंचपाळ्यांत फोडणीचें सामान असतें. पण कांहींचीच आमटी स्वादिष्ट होते. ह्याचें कारण, प्रत्येक पदार्थ कोणत्या वेळीं, कोणत्या अनुक्रमानें, कोणत्या प्रमाणांतील मिश्रणानें वापरावयाचा हें कांहींनाच समजतें व साधतें.

सर्वांनीं नेहमींच स्थळ-काळ ओळखायला हवें. कांहीं कामगिऱ्या तरुणपणींच पार पाडायला हव्यात, कांहीं कामगिऱ्यांसाठी वय वाढण्याची वाट पहायला हवी. गुणसमुच्चयाची आवश्यकता स्वयंसिद्ध आहे; त्याच्या वापरांत तारतम्य आणायला हवें, म्हणजेच गुणांचा प्रभाव पडूं शकतो. अर्थशास्त्राचे सिद्धांत द्रव्यार्जनाच्या कामीं अंमलांत आणणारांनीं तेच सिद्धांत स्वतःच्या दैनंदिन राहणीस लावून पाहण्याचा हा प्रश्न आहे.

— चित्रमयजगत्, नोव्हेंबर, १९५८

## लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनच्या नोकरांना बोनस

लाइफ इ. कॉर्पोरेशननें आपल्या ५०० रु. दरमहा पगाराखालील नोकरांना बिन-भागीदारीचा दोन महिन्यांचा बोनस देण्यास परवानगी दिली आहे. हा बोनस देतांना कॉर्पोरेशननें विमा कायदा व नियम ह्यांत कारभारावरील खर्चाचें सांगितलेलें कमाल प्रमाण ( १५% ) उल्लंघतां कामा नये. नफ्यांत भागी देणें मात्र सरकारी धोरणाच्या विरुद्ध आहे. सरकारी कंपन्यांना होणारा नफा त्या त्या कंपन्यांतील नोकरांनाच फक्त न मिळतां सर्व जनतेस उपलब्ध झाला पाहिजे, असें सरकारचें धोरण आहे. त्याला अनुसरून, ला. इ. कॉर्पोरेशनला सरकारनें नोकरांना बोनस देण्याची बंदी केली होती. पण ती आतां वर सांगितल्याप्रमाणें उठवण्यांत आली. आहे. कॅश अवार्ड, अॅड हॉक पेमेंट, इन्सेंटिव्ह बोनस, इत्यादि नांवाखाली सिंध्री फर्टिलायझर्स, हिंदुस्थान एअर क्राफ्ट, हिंदुस्थान मशीन टूल फॅक्टरी, इत्यादि कारखान्यांतून बोनस दिला जात आहे. ला. इं. कॉर्पोरेशनच्या चेअरमनचें असें मत आहे, कीं नोकरवर्गाची बोनसची मागणी मान्य करण्यांत यावी; म्हणजे कामांत व्यत्यय येण्याचा संभव उरणार नाहीं. ह्या दोन कारणांचा सरकारवर परिणाम झालेला दिसतो. ३१ डिसेंबर, १९५७ अखेरचे हिशेब कॉर्पोरेशननें अद्याप सादर केलेले नाहींत; त्याला ह्या वर्षअखेर मुदत वाढवून देण्यांत आली आहे. ह्या परिस्थितींत, कॉर्पोरेशनचा कारभार उत्पन्नाच्या १५% मध्यें झाला आहे किंवा नाहीं हें कळण्यास सरकारला साधन नाहीं. म्हणून, सरकारनें त्यावर मत व्यक्त न करतां बोनसचा निर्णय कॉर्पोरेशनवर सोपविला आहे.

### स्टर्लिंग शिलकांतील घट

भारताच्या परदेशांतील शिलका आटत जाण्याची गति मंदावली आहे, असें दिसतें. ह्या शिलकांची सर्वांत खालची पातळी ( १७८·५८ कोटी रु. ) ऑक्टोबरच्या शेवटच्या आठवड्यांत गाठली गेली; तेव्हांपासून शिलका हळूहळू वाढत जाऊन आतां त्यांची पातळी १८२·०२ कोटी रु. वर आली आहे. आयातीवरील कडक निर्बंधामुळें आणि परकीय कर्जामुळें हें शक्य झालें आहे. ह्याचा अर्थ, तात्पुरती उसंत मिळाली; पण बाहेरील देणीं वाढत आहेत.

### पंचवार्षिक योजनेवर येत्या वर्षी १०५० कोटी रु. खर्च

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या येत्या म्हणजे चवथ्या वर्षी १०५० कोटी रुपये खर्चाची तरतूद करण्यांत आली आहे. चालू वर्षाच्या खर्चापेक्षा हा खर्च ६० कोटी रुपयांनीं अधिक असेल. १०५० कोटी रुपयांपैकीं निम्मी रक्कम मध्यवर्ती सरकारास खर्चण्यास मिळेल. बाकीची सर्व राज्यांतून वाटली जाईल. दुसऱ्या पंचवार्षिक योजनेच्या पहिल्या तीन वर्षांत मिळून अशा तऱ्हेनें २४५० कोटी रुपये व चार वर्षांत मिळून ३५०० कोटी रु. खर्च होईल.

### पं. नेहरूंचें नाविन्यपूर्ण चरित्र

भारत सेवक समाजाचे चेअरमन, श्री. रामनारायणन चौधन हे पंडित नेहरूंची दिल्ली येथें दर आठवड्यांतून दोनदां भेट घेतात, त्याचा उद्देश पं. नेहरूंचें नव्या धर्तीचें चरित्र तयार करणें हा आहे. प्रत्येक भेट सुमारें एका तासाची असते. त्यावेळीं श्री. चौधन ह्यांच्या प्रश्नांस पं. नेहरू तात्काळ उत्तरें देतात, तीं टेप रेकॉर्ड केलीं जातात.

हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.